जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2024

पुढारी

# सहकार क्षेत्रात बहुस्तरीय संधींची उपलब्धता : काकडे

## विद्यापीठात 'सहकार क्षेत्रातील रोजगाराच्या संधी' विषयी कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सहकार क्षेत्राचे जाळे व्यापक असून, या क्षेत्राला कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी आवश्यकता आहे. या क्षेत्रामध्ये बहुस्तरीय संधींची उपलब्धता असून, त्याचा लाभ घेण्यासाठी युवा पिढीने सज्ज व्हावे, असे आवाहन सहकारी संस्था कोल्हापूर विभागीय सहनिबंधक अरुण काकडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, बँक ऑफ इंडिया चेअर आणि गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार क्षेत्रातील रोजगाराच्या संधी' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

काकडे म्हणाले, महाराष्ट्राचा विचार केल्यास दोन शिखर संस्थांसह राज्यात २ लाख २२ हजार ७३८ सहकारी संस्था आहेत. त्यापैकी कोल्हापूर, सांगली, सातारा या कोल्हापूर विभागामध्ये सर्वच प्रकारांच्या १४ हजार ६७८ सहकारी संस्था आहेत. या सर्व संस्थांमध्ये चांगल्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

केवळ नोकरीच नव्हे, तर अभिनव स्टार्टअप, उद्योग व स्वयंरोजगार व सोसायटी स्थापनेच्या शक्यताही या संधींमध्ये आहेत. त्या संधी प्राप्त करण्यासाठी कामावरील श्रद्धा, परिश्रम यांची तयारी असायला हवी. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

19 JAN 2024 पुण्यनगरी

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे निकाल सरासरी 14 दिवसांत

कोल्हापूर : वैभव गोंधळी

**शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२३ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. २० ऑक्टोबरपासून सुरु आहेत. झालेल्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्याचे कामही विद्यापीठाकडून युध्दपातळीवर सुरू आहे. परीक्षा विभागाने हिवाळी सत्रातील परीक्षांचे निकाल सरासरी १३.९९ दिवसांत जाहीर केले असून, निकाल कमी कालावधीमध्ये जाहीर करण्याचा एक प्रकारचा विक्रमच आहे.**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये घेतल्या जात आहेत. विनाव्यत्यय परीक्षा घेण्याबरोबरच कमीत कमी वेळेत निकाल जाहीर करण्याचे प्रयत्न परीक्षा विभागातर्फे करण्यात आले. योग्य नियोजन, पाठपुरावा आणि तांत्रिक अडचणी सोडवून शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विविध ५७९ परीक्षांचा निकाल तीस दिवसात जाहीर केला. त्यामुळे वेळेत निकाल लावण्याची परंपरा विद्यापीठाने यावर्षीही जपली.

महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार, एखाद्या अभ्यासक्रमाची परीक्षा झाल्यानंतर तिचा निकाल ३० ते ४५ दिवसांमध्ये जाहीर करणे आवश्यक आहे. पण विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने नियोजनबद्ध काम करून ५७९ परीक्षांचे निकाल तीस दिवसांमध्ये जाहीर केले आहेत.

**२०२३ वर्षातील परीक्षाचे निकाल**

| | मार्च | ऑक्टोबर |
|---|---|---|
| एकूण परीक्षा | ६८० | ७०० पैकी ५९० |
| जाहीर निकाल | ६८० | ५७९ |
| सरासरी दिवस | १४.५ | १३.९९ |

## परीक्षा विभागाची उल्लेखनिय कामगिरी



**दिवस - प्रसिध्द झालेले निकाल**

| | | | |
|---|---|---|---|
| ० - ११ | ७ - २७ | १४ - २० | २१ - ९ |
| १ - १६ | ८ - २० | १५ - ४० | २२ - १८ |
| २ - ६ | ९ - ३३ | १६ - १२ | २३ - २५ |
| ३ - १० | १० - ३३ | १७ - ४८ | २४ - १० |
| ४ - १९ | ११ - २१ | १८ - १३ | २५ - १३ |
| ५ - ९ | १२ - १४ | १९ - ११ | २६ - ५२ |
| ६ - २५ | १३ - ३६ | २० - २४ | २७ - ४ |

| दिवसात लागलेले निकाल | ० ते १५ दिवस | १६ ते २० दिवस | २१ ते ३० दिवस |
|---|---|---|---|
| | 340 | 108 | 131 |

मार्च आणि ऑक्टोबर मध्ये झालेल्या ८५टक्के परीक्षांचे निकाल विहित कालावधीत झाले. प्रत्येक महाविद्यालयाला मूल्यमापन तक्ता कळविण्यात आला होता. त्याचा फायदा या प्रक्रियेत झाला.
- डॉ. अजितसिंह जाधव, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ.

19 JAN 2024 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठा इतिहासाच्या संशोधनात मोडी लिपीचे महत्त्व अनन्यसाधारण

: डॉ. अवनीश पाटील

कोल्हापूर : प्रतिनिधी

मराठा इतिहासाच्या संशोधनामध्ये मोडी लिपीच्या अभ्यासाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी व्यक्त केले. शिवराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त इतिहास अधिविभाग, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र, छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी प्रचार व प्रसार या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागात झाली. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. अवनीश पाटील म्हणाले, मध्ययुगीन काळातील मराठा इतिहासाच्या संशोधनासाठी मोडी लिपीचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. मराठा इतिहासाच्या मोडी लिपीतील साधने संपूर्ण भारतातील अभिलेखागार त्याबरोबर लंडन, पॅरिस, स्पेन, हॉलंड येथील संग्रहालयातील मोठी प्रमाणात मोडी कागदपत्रांचा संग्रह आहे. इतिहास अभ्यासकांनी या संग्रहालयातील मोडी कागदपत्रांचा अभ्यास करून अधिकाधिक संशोधन करावे, असे आवाहन केले.

या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात अमोल मङ्ळे यांनी मोडी लिपीच्या अक्षर वळण बाराखडीचे प्रशिक्षण आणि अक्षर ओळख करून दिली. गणेश खोडके यांनी विविध कालगणना, रेघी हिशोबाची पद्धत, जमीन मोजण्याची पद्धत, अभिलेखागारातील मोडी कागदपत्रांचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. नीलांबरी जगताप यांनी मोडीचे ज्ञान प्राप्त करून नव संशोधकांनी मराठा इतिहासात जास्तीत जास्त संशोधन करावे, असे आवाहन केले. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. दत्तात्रय मचाले यांनी केले. त्यांनी मोडी लिपीचा इतिहास आणि मराठा काळात मोडी लिपीचा झालेला प्रसार याचा आढावा घेतला.

19 JAN 2024

तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगीत चिकित्सकांच्या संशोधनाचा शिवाजी विद्यापीठात सन्मान

## बासरीवादक प्रा. सचिन जगताप यांना डॉक्टरेट : 'स्ट्रेस मॅनेजमेंट थ्रु म्युझिक'वर आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसार

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोल्हापुरातील पहिले बासरीवादक व पश्चिम महाराष्ट्रातील पहिले संगीत चिकित्सक प्रा. सचिन जगताप यांना शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभागातील बिझनेस मॅनेजमेंटमध्ये डॉक्टरेट मिळाली. त्यांनी 'द इम्पॅक्ट ऑफ म्युझिक ऑन कंझ्युमर सॅटिस्फॅक्शन अँड एम्प्लॉईज एफिशियन्सी इन सिलेक्टेड ऑर्गनायझेशन इन कोल्हापूर डिस्ट्रिक्ट' यावर शोधप्रबंध सादर केला. भारतातून शिवाजी विद्यापीठामार्फत पहिल्यांदा या अनोख्या विषयावर शोधप्रबंध केला गेला. त्याला डॉक्टरेट मिळाली आहे.



सचिन जगताप गेली १७ वर्षे संगीत चिकित्सेद्वारे अनेक रुग्णांना मोफत चिकित्सा देत आहेत. आजकाल अनेक रिटेल मॉल, रेस्टॉरंट्स, एक्झिबिशन्स, तसेच बँक ऑफिसमध्ये बॅकग्राऊंड म्युझिक लावतात. हे संगीत जे ग्राहक ऐकतात त्यांच्या मनावर आणि खरेदीच्या निवडीवर परिणाम होत असतो. हॉटेलमध्ये संगीत ऐकत भोजनास उपयुक्त वातावरण निर्माण होते. पण हे संगीत कोणत्या प्रकारचे असावे आणि संगीताचे कोणते गुणधर्म असले पाहिजेत, अशा प्रकारचे संशोधन जगताप यांनी करून त्यांनी एक मॉडेल विकसित केले आहे.



सामाजिक कार्यात सहभाग असणाऱ्या जगताप यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राध्यापकांसाठी 'स्ट्रेस मॅनेजमेंट थ्रू म्युझिक' यावर व्याख्यानेही झाली आहेत.

त्यांनी अनेक शोधनिबंध सादर केले आहेत, प्रसिद्ध झाले आहेत. गांधर्व महाविद्यालयाची संगीत अलंकार पदवी त्यांनी अव्वल क्रमांकाने मिळवली आहे. त्यांनी पद्मश्री पंडित हृदयनाथ मंगेशकर, पद्मश्री सुरेश वाडकर, पद्मश्री पद्मजा फेणाणी, पद्मविभूषण आशा भोसले अशा अनेक दिग्गज कलाकारांबरोबर व रियालिटी शोमधील अनेक कलाकारांबरोबर त्यांनी साथसंगत केली आहे.

### चौदा पुरस्कारांनी सन्मानित

कोल्हापूरमध्ये संगीतकार दत्ता डावजेकर, लक्ष्मीकांत-प्यारेलाल शर्मा, संगीतकार श्रीनिवास खळे अशा अनेक दिग्गज कलाकारांना पहिल्यांदा कोल्हापूरमध्ये आणून रसिकांना त्यांच्या श्रवणीय गीतांचा लाभ दिला आहे. आजपर्यंत सचिन जगताप यांना सुधीर फडके पुरस्कार, माण कलाभूषण पुरस्कार अशा विविध १४ पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

जगताप हे छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट (सायबर) मध्ये सहाय्यक प्राध्यापक आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठ सिग्नेचर ट्यून तयार केली आहे. त्यांचे बासरीचे गुरु पंडित हरिश्चंद्र कोकरे, पंडित नित्यानंद हळदीपूर, पंडित प्रवीण गोडखिंडी व सुगम संगीताचे गुरु ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे, लक्ष्मीकांत प्यारेलाल शर्मा, पंडित रमाकांत परांजपे आणि पंडित श्यामकांत परांजपे आहेत.

सचिन जगताप यांच्या संशोधनासाठी प्रबंधासाठी प्रिन्सिपल डॉ. गुरुनाथ फगरे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. एस. एस. महाजन, सायबरचे सचिव डॉ. रणजित शिंदे, विश्वस्त सी. ए. ऋषिकेश शिंदे, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. के. व्ही. मारुलकर, डॉ. प्रवीण चव्हाण, पत्नी सौ. वैशाली जगताप यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2024
पुढारी

# वक्तृत्व स्पर्धेत नाझ सिद्दीकी प्रथम

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचा उपक्रम





नाझ सिद्दीकी गौतमी शिकलगार राधिका शर्मा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने मराठी पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेत नाझ सिद्दीकीने प्रथम क्रमांक पटकावला. गौतमी शिकलगार, राधिका शर्मा यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेसाठी लोकशाही मूल्ये आणि पत्रकारिता, अर्थकारणाचा पत्रकारितेवरील प्रभाव आणि पत्रकारितेची सद्यःस्थिती आणि भवितव्य हे तीन विषय निश्चित केले होते. नाईट कॉलेजच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. अरुण शिंदे, सांगली आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी डॉ. दीपक ठमके यांनी परीक्षण केले. विजेत्यांना रोख बक्षिसे, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत पत्रकारिता व जनसंवाद विभाग, एम. ए. मास कम्युनिकेशन विभाग, पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, ऐतवडे येथील वारणा महाविद्यालय, तिटवे येथील शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय, संजय घोडावत विद्यापीठ आदी संस्थांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. ऋषीकेश पाटीलने सूत्रसंचालन केले. साजिद शेखने आभार मानले. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. प्रसाद ठाकूर, जयप्रकाश पाटील, आनंदा पांढरबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JAN 2024 तरुण भारत

# विजयसिंह यादव महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची हॉकीसाठी निवड



**पेठ वडगाव :** येथील श्री विजयसिंह यादव महाविद्यालय पेठवडगावच्या खेळाडू आशा सुखदेव गायकवाड, अपूर्वा दिलीप शिंदे यांची ग्वाल्हेर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी छत्रपती शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली.

या खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष माजी पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ, उपाध्यक्षा विजयादेवी यादव, सचिव विद्याताई पोळ, कार्यवाह अभिजित गायकवाड, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. सुनिल पाटील, प्रभारी प्राचार्य अशोक चव्हाण यांचे प्रोत्साहन तर क्रीडा मार्गदर्शक संताजी भोसले व प्रशिक्षक राहुल गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.